# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/10/2023 (गुरूवार) सकाळ


**एमआयडीसी बोरी येथे कंपनीतून लोखंडी प्लेटा चोरी करणाऱ्या आरोपीला एकुण १५,२८९५०/—रू. चे मुद्देमालासह अटक स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची कारवाई**

पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत इन्वेटसि कंपनी प्रा. लि. येथे दिनांक १०/१०/२०२३ चे १८.३० वा. ते दिनांक ११/१०/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने १९ नग लोखंडी प्लेटा चोरून नेल्याचे फिर्यादी नामे सचिन दगडु काडदंते, वय ४२ वर्ष, रा. वाघाडे ले आउट बुट्टीबोरी, ता. हिंगणा यांचे तोंडी रीपोर्ट वरून दिनांक १६/१०/२०२३ रोजी पोस्टे एमआयडीसी बोरी येथे अप क्र. ३९६/२३ कलम ३७९ भादंवि.चा गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक करीत असतांना दिनांक १८/१०/२०२३ रोजी गोपनीय माहितीच्या आधारे एमआयडीसी बुट्टीबोरी परिसरातून ट्रक चालक नामे— **हैदर अली शहशाद अली, वय ३३ वर्ष, रा. मुंगरी गलियाबाद त. करछना जि. प्रयागराज (उत्तप्रदेश)** यास तो चालवित असलेला १० चक्का ट्रक क्र. एम.एच—३१/सी.क्यु—९६१९ सह थांबवुन वरील नमुद गुन्हया संबंधाने विचारपुस केली असता उडवाउडविची उत्तरे दिली. पंचासमक्ष त्याच्या ताब्यातील ट्रकचे कॅबिन मधील कंपार्टमेंटची पाहणी केली असता त्यामध्ये सदर गुन्हयातील चोरीस गेलेल्या लोखंडी प्लेटापैकी ०८ नग लोखंडी प्लेटा वजन अंदाजे २०० किग्रॅ किंमती २२,०००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आला. यावरून अधिक विचारपुस केली असता ट्रक चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रकने इन्वेटसि कंपनी प्रा. लि. मध्ये जावून सदरचा गुन्हा केल्याचे सांगितले. यावरून त्याचे ताब्यातून सदर चोरी गेलेल्या लोखंडी प्लेटापैकी ०८ नग लोखंडी प्लेटा किंमती २२,०००/—रू. उर्वरीत प्लेटा विकुन खर्च करून शिल्लक राहीलेले नगदी ३२००/—रू. इतर लोखंडी प्लेटा व ॲंगल वजन अंदाजे ७५ किग्रॅ. किंमती ३७५०/—रू. व सदर गुन्हा करतेवेळी वापरलेला १० चक्का ट्रक क्र. एम.एच—३१/सी.क्यु—९६१९ किंमती १५,००,०००/—रू. असा एकुण १५२८९५०/—रू. मुद्देमाल जप्त करून जप्त मुद्देमालासह आरोपी पोलीस ठाणे एमआयडीसी बोरी यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास पोस्टे एमआयडीसी बोरी करीत आहे.

सदरची कारवाई नागपुर ग्रामीणचे पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधिक्षक डॉ. श्री. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक आशिषसिंग ठाकूर, पोलीस हवालदार मिलींद नांदुरकर, महेश जाधव, मयुर ढेकळे, पोलीस नायक अमृत किनगे, रोहन डाखोरे, तसेच सायबर सेलचे पोलीस नायक सतिश राठोड यांचे पथकाने केली आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर